**कृपया प्रसिद्धीसाठी** **19 एप्रिल 2014**

**माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी शनिवार, 19 एप्रिल रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत केलेले निवेदन.**

***मुंबईच्या मतदार याद्यांमध्येही गोंधळ;बोगस मतदानाची शक्यता : राम नाईक***

**मुंबई, शनिवार :** मुंबईच्या मतदार याद्यांमध्येही घोळ झाले असून 24 तारखेला पुण्याप्रमाणेच मुंबईतही गोंधळ होण्याची शक्यता आहे, अशी भीती माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केली.

या संदर्भात तपशीलात माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, ‘‘मतदार याद्यांमध्ये दुबार मतदार तसेच बोगस मतदार नोंदले गेल्याच्या वारंवार तक्रारी करुनही निवडणूक आयोगाने त्याबाबत पुरेशी उपाययोजना केली नाही की काय असे आता वाटते आहे. वानगीदाखल मी स्वतः गेली 52 वर्षे ज्या इमारतीत राहातो आहे तिची मतदार यादीही मोठी धक्कादायक आहेत. आमच्या इमारतीत प्रथमच यावेळच्या मतदार यादीत 30 टक्के बोगस मतदार नोंदले गेले आहेत. काल ज्यावेळी शासनाकडून मतदार चिठ्ठी आल्या त्यावेळी हे लक्षात आले’’.

मतदार यादीतील या गोंधळाची माहिती देताना श्री. नाईक म्हणाले, ‘‘उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघातील 163 - गोरेगाव विधानसभेच्या यादी भाग क्र. 177 मध्ये अनुक्रमांक 17 वर माझे नाव आहे. या यादीत अनुक्रमांक 1 ते 30 पर्यंत माझ्या इमारतीतील रहिवाशांची नावे आहेत. तथापि, प्रत्यक्षात 1 ते 20 च रहिवासी इमारतीतील आहेत. 21 ते 30 ही नावे पूर्णतः अपरिचित आहेत. ती पाहून धक्का बसल्याने मी इंटरनेटवरुन अधिक तपासणी केल्यानंतर गोरेगाव विधानसभेतच यादी भाग 92 मध्ये अनुक्रमांक 722 ते 732 (723 वगळता) हीच नावे असल्याचे लक्षात आले. दोन्ही याद्यांमध्ये व्यक्ति त्याच असल्याचे छायाचित्रांवरुन स्पष्ट होत असले तरी त्यांच्या मतदार ओळखपत्रांचे क्रमांक मात्र वेगवेगळे आहेत’’.

‘शिवस्मृती’ गृहनिर्माण संस्थेचे श्री. नाईक संस्थापक सदस्य असून 1962 पासून म्हणजे गेली 52 वर्षे त्यांचे तिथे वास्तव्य आहे. या सर्व व्यक्तिनां कोणत्या पुराव्यांच्या आधारावर या पत्त्यावर ओळखपत्रे दिली गेली हे जाणून घेण्यास आपण उत्सुक असल्याचे सांगून श्री. नाईक म्हणाले, ‘‘खरी भीती ही आहे की असा गोंधळ मोठ्या प्रमाणावर असला, तर मतदानाच्या दिवशी पुण्याचीच पुनरावृत्ती मुंबईत होईल. यामागे काही षड्यंत्र आहे की काय याचीही तपासणी व्हायला हवी’’.

या संदर्भात जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून मुंबई उपनगर जिल्हाधिकारी श्री. शेखर चन्ने यांची तात्काळ भेट घेऊन त्यांना पत्र दिल्याचेही श्री. राम नाईक यांनी यावेळी सांगितले. पत्रकारांच्या माहितीसाठी गोरेगाव विधानसभेत दुबार नोंदणी झालेल्या या मतदारांची नावे असलेली दोन्ही मतदार यादी भागांची प्रतच श्री. नाईक यांनी सादर केली. अशा दुबार नावांमुळे मतदानाचे पावित्र्य नष्ट होण्याची भीती व्यक्त करुन जिल्हाधिका-यांनी आपण काय कारवाई करणार याची माहिती जनतेला दिली पाहिजे अशी मागणीही श्री. नाईक यांनी केली.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : 1) यादी भाग क्रमांक 177, पान 3**
**2) यादी भाग क्रमांक 92, पान 27**